**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

# विद्यापीठाच्या मानव विज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी डॉ. अविनाश मोहरील रुजु

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या मानव विज्ञान विद्याशाखेच्या कायम अधिष्ठातापदी महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील हे आज रुजु झालेत. प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर व कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी त्यांचे पुस्तक देवून स्वागत केले. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या निवड समितीने त्यांची मानव विज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी निवड केली होती.

डॉ. अविनाश मोहरील यांनी एम.ए. इंग्रजी परीक्षेत सुवर्णपदक प्राप्त केले आहे. इंग्रजी विषयात त्यांना आचार्य पदवीने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये ९ शोधनिबंध प्रकाशित झाले असून आय.एस.एस.एन. आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये २२ संशोधन पेपर प्रकाशित झाले आहेत. याशिवाय यु.जी.सी. कडून प्राप्त मेजर रिसर्च प्रोजेक्ट पूर्ण केला आहे. त्यांना अध्यापनाचा पंधरा पेक्षा अधिक वर्षांचा अनुभव असून जवळपास चार वर्षांचा प्रशासकीय अनुभव आहे. याशिवाय सात वर्षांपासून ते सक्षमपणे प्राचार्यपदी कार्यरत होते.

त्यांनी अनेक वत्कृत्व, वादविवाद स्पर्धांमध्ये पारितोषिके जिंकली असून ते व्हॉलीबॉलचे उत्कृष्ट खेळाडू राहीले आहेत. आपल्या महाविद्यालयाचे नॅकचे मानांकन समन्वयक म्हणून त्यांनी केले असून अनेक नामांकित संस्थेचे ते पदाधिकारी आहेत. स्वीडन, डेन्मार्क व नार्वे देशांचा अभ्यास दौरा त्यांनी केला आहे. विद्यार्थ्यांना समुपदेशन व ताण नियोजनाकरीता त्यांनी मार्गदर्शन केले असून महाराष्ट्रासह देशभर विविध विषयांवर अनेक व्याख्याने दिली आहेत. याशिवाय विद्यापीठाच्या विविध समित्यांवर त्यांनी कार्य केले आहे. त्यांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा फायदा मानव विज्ञान विद्याशाखा वृद्धींगत करण्यासाठी नक्कीच होणार असून त्याचा जास्तीतजास्त फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे.

मानव विज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठातापदी डॉ. अविनाश मोहरील यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे सार्वत्रिक अभिनंदन होत आहे. त्यांचे रुजुप्रसंगी वि. व तं. विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एफ.सी. रघुवंशी, प. व मू. मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख, वित्त व लेखा अधिकारी डॉ. भारत कऱ्हाड, आय.आय.एल.चे संचालक डॉ.डी.टी. इंगोले, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. मोहन खेरडे, वि. वि. विभागाचे संचालक डॉ. दिनेश सातंगे, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, उपकुलसचिव डॉ. प्रवीण राठोड, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर आदी उपस्थित होते.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २८/०५/२०१९.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी